नागरी जमिन ( कमाल धारणा व विनियमन) अधिनियम,१९७६
अंतर्गत माहिती व तंत्रज्ञान उद्योग विकसित करण्यासाठी कलम २०
अन्वये सूट देण्याबाबत सुधारीत धोरण..

---

**महाराष्ट्र शासन.**

**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र. नाजक २००७/प्र.क्र.२२२/नाजकथा-२**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - २३ नोव्हेंबर,२००७.**

**वाचा :- महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र. नाजक-१०(२००४)/प्र.क्र.१२/नाजकथा-१,**
**दिनांक - १४.७.२००४.**

**प्रस्तावना :-**

नागरी जमिन ( कमाल धारणा व विनियमन) अधिनियम,१९७६ अंतर्गत अतिरिक्त ठरलेल्या जमिनींवर माहिती व तंत्रज्ञान उद्योग विकसित करण्यासाठी कलम २० अन्वये सूट देण्याचे धोरण उपरोक्त दिनांक १४.७.२००४ च्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आले आहे. त्यानुसार अधिनियमांतर्गत अतिरिक्त ठरलेल्या जमिनींवर माहिती व तंत्रज्ञान उद्योग विकसित करण्यासाठी जमिनींच्या प्रचलित बाजारभावाच्या किंमतीच्या १५ टक्के रक्कम शासनदेय अधिमूल्य म्हणून आकारून कलम २० अंतर्गत परवानगी देण्यात येते. शासनाच्या सदर धोरणास सरल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**: <u>शासन निर्णय</u> :**

शासन निर्णय दि.१४.७.२००४ मध्ये सुधारणा करण्यात येत असून अतिरिक्त जमिनींवर माहिती व तंत्रज्ञान उद्योग विकसित करण्यासाठी कलम २० अंतर्गत परवानगी देताना अतिरिक्त ठरलेल्या जमिनीच्या बाजारभावाने होणाऱ्या रकमेच्या १.० टक्के रक्कम शासन देय अधिमूल्य म्हणून आकारण्यात येईल.

Scanned with CamScanner

तसेच माहिती व तंत्रज्ञान उद्योग विकसित करण्यासाठी विकासकास मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा १०० टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचे बांधकाम अनुज्ञेय होते. सदर प्रकल्प विकसित करताना विकासकास अनुज्ञेय होणाऱ्या अतिरिक्त १०० टक्के चटई क्षेत्र निर्देशांकासाठी जमिनीच्या प्रचलित बाजारभावाच्या किंमतीच्या ५ टक्के रक्कम शासनाला अदा करणे विकासकावर बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. कृ. कुलकर्णी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव/ सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर.
९) जिल्हाधिकारी, ठाणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, नागपूर, पुणे, मुंबई, मुंबई उपनगर.
१०) महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई/पुणे/ठाणे/उल्हासनगर/नागपूर/मिरा-भाईंदर/कल्याण-डोंबिवली/भिवंडी/नाशिक/कोल्हापूर/सोलापूर/सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका.
११) अतिरिक्त जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, मुंबई/पुणे/नागपूर/नाशिक/ठाणे.
१२) उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर/सोलापूर/कोल्हापूर/सांगली.
१३) मुख्य अधिकारी, नगरपरिषद अंबरनाथ/बदलापूर/वसई-विरार/कामठी/तळेगाव-दाभाडे.
१४) या विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी, निवडनस्ती/ कार्यासन-१, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.